महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**मुख्य अभियंता, वाणिज्य विभाग, प्रकाशगड,स्टेशन मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.**

पीआर-३/नवप्रकाश योजना/ २८५७४ दिनांक : १५.७.२००८

**वाणिज्य परिपत्रक – ८३**

विषय :- वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडीत करण्यात आलेल्या घरगुती वीज ग्राहकांसाठी **"नवप्रकाश योजना"**

प्रस्तावना

वीज बिल थकीत असणा-या ग्राहकांचा वीज पुरवठा प्रथम तात्पुरता खंडीत करण्यात येतो व त्यांनी थकबाकीची रक्कम न भरल्यास, सहा महिन्यानंतर तो कायमचा खंडीत करण्यात येतो. कालांतराने थकीत रकमेची वसुली करण्याकरिता कायदेशीर कारवाईची पावले उचलली जातात. अशा काही बाबतीत वीज पुरवठा कायमचा खंडीत केलेले ग्राहक पुनर्जोडणी करीता येतात परंतु सर्व खंडीत प्रकरणे पूर्ववत जोडून देता येत नाहीत . अशी वीज पुरवठा पूर्ववत करता न येणारी प्रकरणे साधारणत: ग्राहक गैरहजर असणे किंवा वीज देयका संदर्भात तक्रारी किंवा वाद प्रलंबित असणे, अशा वादग्रस्त देयकांचा वाद अधिक कालावधी पर्यंत न सुटल्यामुळे व ग्राहकांनी देयके न भरल्यामुळे त्या थकीत रकमेवर व्याज व विलंब आकार आकारला जातो व अशी थकीत रक्कम कालांतराने वाढत जाते.

अशा प्रकरणी काही बाबतीत अशीही शक्यता असते की, थकीत बिलाच्या कारणांमुळे वीज पुरवठा कायमचा खंडीत केलेले ग्राहक अनधिकृतरित्या विजेचा वापर करत आहेत. अशी थकबाकीची रक्कम, निर्धारित कालावधीत वसूल न झाल्यास ती रक्कम कालबाहय होते व ही रक्कम वीज वितरण कंपनीला वसूल करणे कठीण होते. त्यामुळे या कायमचा खंडीत केलेल्या घरगुती वीज ग्राहकांचा वीज पुरवठा पूर्ववत करुन त्यांना पुन्हा वीज ग्राहक बनविल्यास महावितरण कंपनीच्या महसुल वाढीस मोठी मदत होईल व त्याचबरोबर ग्राहकांना वीजेपासून वंचीत रहावे लागणार नाही.

वरील पार्श्वभूमीचा विचार करता थकीत रक्कमेपोटी कायमचा वीज पुरवठा खंडीत केलेल्या घरगुती वीज ग्राहकांसाठी **"नवप्रकाश योजना"** जाहीर करण्यात येत आहे. या योजनेमध्ये मंजुर जोडभार ०.५ (अर्धा) किलोवॅट इतका अथवा त्यापेक्षा कमी असणा-या व ज्या घरगुती वीज ग्राहकाचा वीज पुरवठा दिनांक ३१/३/२००८ पूर्वी कायमचा खंडीत करण्यात आलेला आहे फक्त असेच सर्व **घरगुती** लघुदाब वीज ग्राहक या योजनेकरिता पात्र राहतील.

**सदर योजना १५ जुलै २००८ ते ३० ऑगस्ट २००८ या सिमित कालावधी करीता राहील.**

**नवप्रकाश** योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) या योजनेमध्ये फक्त तेच घरगुती ग्राहक पात्र आहेत ज्यांचा मंजूर जोडभार ०.५ (अर्धा) किलोवॅट इतका अथवा त्यापेक्षा कमी आहे आणि ज्याचा वीज पुरवठा दि. ३१/३/२००८ पूर्वी कायमचा खंडीत करण्यात आलेला आहे.

२) ज्या ग्राहकांची थकबाकी दि. ३१/३/२००८ पर्यंत रु. १०,०००/- व त्यापेक्षा जास्त असेल व वरील (१) नुसार ज्यांची पात्रता आहे अशा ग्राहकांनी रु. ५०००/- एकरकमी एकवेळची तडजोड म्हणून भरल्यास त्यांचा वीज पुरवठा पूर्ववत सुरु करण्यात येईल.

३) ज्या ग्राहकांची थकबाकी दि. ३१/३/२००८ पर्यंत रु. १०,०००/- पेक्षा कमी असेल व वरील (१) नुसार ज्याची पात्रता आहे, अशा ग्राहकांचा वीज पुरवठा पूर्ववत करण्याकरीता त्यांच्या थकबाकीची ५० टक्के रक्कम एकरकमी भरणे आवश्यक राहील.

४) विजेचा जोडभार व थकबाकीची रक्कम महावितरण कंपनीच्या संगणक प्रणालीच्या आधारेच गृहीत धरण्यात येईल.

५) या योजनेचा लाभ घेणा-या ग्राहकाविरुध्दची प्रलंबित कायदेशीर कार्यवाही त्यांनी निर्धारित रक्कम व तत्सम बाबींची पूर्तता केल्यानंतरच मागे घेण्यात येईल.

६) जर ग्राहकाने महावितरण कंपनीवर कायदेशीर कार्यवाही केलेली असल्यास, सदर कार्यवाही मागे घेतल्यानंतरच या योजनेस ग्राहक पात्र राहील.

७) अशा पात्र ग्राहकांचा वीज पुरवठा पूर्ववत केल्यानंतर त्यांनी वीजेची देयके पुढील वर्षभर नियमित भरणे बंधनकारक असेल. जर या एक वर्षाच्या कालावधीत ग्राहक चालू देयकाचा भरणा करण्यास असमर्थ ठरल्यास, मुळ थकबाकी पूर्ववत लागू करण्यात येईल आणि ती रक्कम व्याजासहित भरण्यास ग्राहक जबाबदार राहील.

८) सदर ग्राहकास याबाबतीत रु. २०० चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र दयावे लागणार आहे (मसुदा सोबत जोडला आहे)

९) ज्या ग्राहकांविरुध्द वीज चोरी बद्दल कार्यवाही चालू असेल अशा ग्राहकांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

१०) देयका संदर्भात तक्रारी किंवा वाद प्रलंबित असलेले व वरील क्र. (१) प्रमाणे पात्र असलेले ग्राहक या योजनेकरिता पात्र असतील.

११) वीज पुरवठा पूर्ववत करण्यापूर्वी महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे चांचणी अहवाल सादर करणे बंधनकारक असेल व ग्राहकांना नियमानुसार रु. ५००/- विद्युत जोडणी आकार व रु. ४००/- अनामत रक्कम भरावी लागेल. ही रक्कम वर नमूद केलेल्या क्र. २ किंवा क्र. ३ च्या शिवाय आहे.

१२) ही नवप्रकाश योजना दि. १५/७/२००८ ते ३०/८/२००८ पर्यंत लागू राहील.

१३) या योजनेमध्ये समावेश असलेल्या ग्राहकाने सोबत जोडलेले हमीपत्र भरुन देणे बंधनकारक राहिल.

१४) या योजनेचा लाभ घेणा-या ग्राहकांची नोंद स्वतंत्र रजिस्टर मध्ये करावी.

१५) सदर योजनेबाबतचा सविस्तर अहवाल योजना संपल्यानंतर जास्तीत जास्त १५ दिवसांत पाठवावा.

अजितकोटे

**संचालक (वित्त), महावितरण**

प्रत

प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना

---

**हमीपत्र** (रु. २००/- चे स्टॅम्प पेपरवर )

मी / आम्ही ------------------------------------------ राहणार, ------------------------ वीज पुरवठा कायमचा खंडीत केलेले ग्राहक आहे/ आहोत आणि मला / आम्हाला थकबाकीमुळे वीज पुरवठा कायमचा खंडीत केलेल्या लघुदाब घरगुती वीज ग्राहकांसाठी असलेल्या "नवप्रकाश योजने" अंतर्गत रुपयें ------------- फक्तचा भरणाकरुन वीज जोडणी घ्यावयाची आहे.

मी /आम्ही जाहीर करतो की, माझ्यावर / आमच्यावर असलेल्या थकबाकीमध्ये कुठल्याही प्रकारचा वीज चोरी रकमेचा समावेश नाही. जर पुढे कधी थकबाकीच्या रकमेत वीज चोरी आढळून आल्यास मी /आम्ही या योजनेस पात्र राहणार नाही आणि तद्नंतर या योजने अंतर्गत भरलेल्या रकमेच्या परताव्यास पात्र राहणार नाही.

मी / आम्ही अशी हमी देतो की, वीज पुरवठा पुर्ववत केल्यानंतर पुढील मासिक चालू देयके एका वर्षाच्या कालावधीकरिता नियमित भरेन./भरु. मासिक देयकाचा नियमित भरणा करण्यास असमर्थ ठरल्यास, माफ केलेली संपुर्ण थकबाकीची रक्कम त्याच्या पुर्व पदावर नेऊन ती व्याजासकट भरणा करण्यास आम्ही बांधिल राहू.

स्वाक्षरी :

नांव :

पत्ता :

ग्राहक क्र.

स्थळ :

दिनांक :

---

कार्यालयीन वापराकरीता :

प्रमाणित करण्यात येते की, सदर ग्राहकांविरुध्द वीज चोरी बद्दल कार्यवाही करण्यात आलेली नाही/प्रलंबित नाही.

शाखा अधिकारी/उप विभागीय अधिकारी

महावितरण